अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणारांच्या मनाचा गुण होय.

वर्ष १८ वें, अंक १ ला,

# स मा ज स्वा स्थ्य

जुलै १९४४

किंमत १ आणा

## अनुक्रमणिका

| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १. वाचकांस अिषारा | १ |
| २. देव दयाळू कां ? | २ |
| ३. ग्रंथपरीक्षण | ६ |
| ४. शारदेचें पत्र | ९ |

# वाचकांस अिषारा

कागदासंबंधी सरकारच्या नवीन हुकुमाची कुऱ्हाड वर्तमानपत्रांखेरीज अितर सर्व नियतकालिकांवर पडत असल्यामुळें आम्हास दर महिन्यास फक्त १० पानें काढण्याची परवानगी मिळत आहे, आणि दोन महिन्यांचा सरासरीने हिशोब करण्याची सवलत असल्यामुळें अेका महिन्याला १२ व दुसऱ्या महिन्याला ८, अशा अनुक्रमाने अंक काढतां येतील. परंतु आठच पानांचा अंक काढणें आम्हास अिष्ट वाटत नाही व परवडणारही नाही. कांहीं अधिक पानें काढण्याची परवानगी मिळावी म्हणून आम्ही अर्ज केला आहे, परंतु तो मंजूर होअीलच असें सांगतां येत नाही. तेव्हा तो मंजूर न झाल्यास यापुढें कांहीं

महिने, म्हणजे या हुकुमांत इष्ट फरक होईपर्यंत, मासिक तहकूब ठेवण्याशिवाय आम्हास गत्यंतर राहणार नाही. जाहिराती दोन्ही अंक मिळून चारच पानें घेतां येतील व तीं पानें आम्हासच पुरत नसल्यामुळें अितर जाहिराती घेतां येणारच नाहींत.

पुढील अंक निघतील याची खात्री नसल्यामुळे ज्यांची वर्गणी संपली आहे त्यांकडे देखील या अंकाची व्ही. पी. केलेली नाही. मासिक तहकूब झाल्यास ज्यांना राहिलेली वर्गणी परत पाहिजे असेल, त्यांनीं तसें कळवावें, म्हणजे मनीऑर्डरीचा खर्च वजा करून ती परत करण्यांत येअील. आपली वर्गणी कधीं संपते हें वर्गणीदारांस कळावें म्हणून छापील पत्त्याचे आरंभीं अेक आंकडा छापलेला असतो. तो शेवटच्या महिन्याचा आंकडा समजावा. उदाहरणार्थ नांवाचे आरंभीं ५ हा आंकडा असल्यास वर्षांतील पांचवा महिना मे असल्यामुळे मेचा अंक शेवटचा समजावा. यावरून वर्गणी किती शिल्लक आहे हें कळेल. जे वर्गणी परत मागणार नाहीत, त्यांची वर्गणी तहकूब राहील व जेव्हां मासिक पुन्हा सुरू होईल तेव्हां ती हिशेबांत धरण्यांत येअील.

पुढचा म्हणजे आगस्टचा अंक निघाल्यास ज्यांची वर्गणी जून किंवा जुलैच्या अंकाबरोबर संपली असेल, त्या सर्वांकडे तो अंक व्ही. पी.ने पाठवण्यांत येअील. परवानगी मिळाल्यास किती पानांची मिळेल हें माहीत नसल्यामुळे वर्गणी किती ठेवावी हा हिशोब सध्यां करतां येत नाहीं. जी वर्गणी ठरेल त्या मानाने व्हीं. पी. करावी लागेल. **पुनः अिशारा देण्यास सवड राहणार नाहीं.** ज्यांची वर्गणी आगाऊ भरलेली असेल, त्यांचा हिशोब अर्थातच वर्गणीच्या नवीन दराप्रमाणें करून मुदत वाढवण्यांत येअील.

---

# देव दयाळू कां ?

देव दयाळू आहे अशी अेक कल्पना प्रचलित आहे. अर्थात् देवच काल्पनिक असल्यामुळे त्याचे बाबतींत वाटेल त्या कल्पना करायला सर्वांनाच मोक-

ळीक असते. पण अीश्वर मानणारांनी देखील जर थोडासा सरळ विचार करायचा प्रयत्न केला, तर त्यांना हें सहज दिसलें पाहिजे की जगांत जे अत्याचार नेहमी चाललेले असतात, त्यांत निरपराधी माणसांचें अितकें निष्कारण नुकसान होत असतें की तें पाहिल्यावर देव दयाळू आहे असें म्हणायला बिलकुल जागा रहात नाही. याला उत्तर म्हणून अीश्वरवादी लोक पुनर्जन्म पुढें करतात. ' अेखाद्याने मागील जन्मीं जर पापें केलेली असलीं, तर त्यांचें फळ त्याला या जन्मी भोगावें लागेंत, त्याला अीश्वर काय करील ? ' क्रौर्याच्या आरोपांतून अीश्वराचा बचाव करण्याकरतां जी ही पुनर्जन्माची कल्पना काढलेली आहे, ती केवळ वकिली आहे, आणि अेखाद्या बावळट वकिलाला देखील ती शोभण्यासारखी नाही, कारण अीश्वराला कर्माविरुद्ध कांही करतां येत नाही अशी स्पष्ट कबुली त्यांत आहे. म्हणजे या बचावांत त्याच्या सर्वशक्तिमत्तेवर धाड आणली आहे. आणि दुसरें असें कीं हें जग आणि पुनर्जन्म वगैरे सगळेंच जर अीश्वराने उत्पन्न केलें आहे, तर त्यांत जें जें कांही होअील त्याबद्दल अीश्वरच जबाबदार राहतो. म्हणजे मागील जन्मांतल्या पापांची देखील जबाबदारी त्याच्यावरच येते, ती या बचावानें टळत नाही.

पण अशी ही बावळट वकिली करून अीश्वराला दयाळू म्हणण्याचा हा अट्टाहास लोक कां करतात ? जगांत जर अत्याचार नेहमी दिसतात, तर अीश्वर अत्याचारी आहे असें सरळ कबूल कां करीत नाहींत ? याचें कारण शोधणाराला तें सांपडणें कठिण नाही. धार्मिक ग्रंथांचा थोडा अभ्यास केल्यास तें सहज सांपडतें. बायबलांत असें स्पष्ट सांगितलें आहे की ' तुम्ही अितर कोणात्याही देवांना भजतां नये, कारण तुमचा देव मी आणि मी असहिष्णु आहें. माझा जो द्वेष करील, त्याच्या मुलांनाच नव्हे तर तिसऱ्या चौथ्या पिढीपर्यंत त्याच्या सर्व वंशजांना मी शिक्षा करतों. पण जो माझ्यावर प्रेम करून **माझ्या आज्ञा पाळील,** त्याला मी दया दाखवतों. ' या अशा देवाला कोणत्याही रीतीनें वाअीट म्हणतां नये, त्याची नेहमी स्तुतिच करीत राहिलें पाहिजे, नाहीतर तो काय करील कोणाला ठाऊक ? अशी भीति धार्मिक लोकांना अेकसारखी वाटत राहिली तर नवल

नाहीं. बायबलांतला देव हा फक्त ख्रिस्ती लोकांचाच नव्हे तर मुसलमानांचाही देव तोच आहे. कारण ख्रिस्ती धर्मांतच तथाकथित सुधारणा करून महंमदी धर्म निघालेला आहे. आदम आणि ईव्ह संबंधी बायबलांत दिलेली हकीकत मुसलमान मान्य करतात. तेव्हां त्यांच्या देवाबद्दल वेगळें लिहायला नको.

हिंदूंचा देव देखील असाच आहे, याची साक्ष भगवद्गीतेवरून पटेल. अीश्वर अेक आहे ही कल्पना बायबलांत नाहीं, तशीच हिंदु धर्मांतही नाहीं. हिंदु धर्मांत तर अेक देवयोनिच कल्पिलेली आहे, आणि अीश्वर अेक आहे ही कल्पना बरीच अलीकडची आहे. गीतेंतला श्रीकृष्ण सांगतो कीं जगांत माझ्याशिवाय कांहीं नाहीच, बाकी सर्व माया आहे. पण याचा अर्थ अितकाच की देवयोनि देखील मीच उत्पन्न केलेली आहे. तें असो, पण हिंदु लोक देखील देवाला दयाळू कां म्हणतात, याचें कारण भगवद्गीतेंत सांपडतें.

'ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहम्' या श्लोकावर टीका करतांना व आणखीही पुढें वामनाने यथार्थदीपिकेंत लिहिलें आहेः—'परि कल्पवृक्षस्वभाव । अगा ! मी देवाधिदेव । ज्या रूपीं ज्याचा जैसा भाव । त्या रूपें तैसींच मी फळें देतों ॥...दोष लावतां अीश्वरा । दोष लागती त्या पामरा । निर्दोष समजे त्या नरा । अीश्वर करी निर्दोष ॥ ... हा कल्पवृक्ष अन्न देतो । म्हणतां अन्नची देतसे तो । हा धोंडे देतो म्हणजे तों । धोंडमार होतो त्यावरी ॥ म्हणूनि भगवद्वाणी बोलते । की ' ये यथा मां प्रपद्यंते ' ।...यांत श्रीकृष्णाने स्पष्ट धमकी दिली आहे की 'संभाळून रहा ! मला तुम्ही दुष्ट म्हटलेंत तर मी तुमच्यापुरता दुष्ट होअीन, मला दयाळू म्हटलेंत तरच मी तुमच्यावर दया करीन. तेव्हां दयेची अपेक्षा करणारे बिचारे पामर त्याला दयाळू न म्हणून काय करणार ? न म्हटलें तर हा काय करील कोणाला ठाऊक ? तेव्हां त्याला दयाळू म्हटलेलें काय वाअीट ? तेव्हां लोक जें देवाला दयाळू म्हणतात, तें त्यांना देव खरोखर दयाळू वाटतो म्हणून नव्हे, कारण देव दयाळू आहे असें खरोखर कोणाला वाटेल ? पण ' दुर्जनं प्रथमं वंदे ' हा जो व्यावहारिक नीतिनियम आहे, त्याला अनुसरूनच देव दयाळू आहे असें म्हणणें लोकांना भाग पडतें.

# देव दयाळू कां ?

आणि म्हणूनच आमच्यासारख्या नास्तिकांना लोक नेहमीं सांगत असतात की, 'अरे बाबा ! तुला तरी कोठे नक्की माहीत आहे की देव नाहीच म्हणून ? मग तो आहे असें समजून त्याची थोडीशी स्तुति केली तर बिघडलें कोठें ? नसला तर आपले थोडेसे श्रम फुकट जातील अेवढेंच. पण असला तर केवढा फायदा होओल ? पण तुमच्यासारखें देवाची निंदा करीत सुटलें, आणि देव खरोखरच असला, तर परिणाम किती भयंकर होतील, पहा ना ? तेव्हां आपलें आहे असें धरून चालणें बरें, असें नाही का वाटत ?'

पण आमच्यासारख्यांची खात्री असते की देव म्हणजे अेक थाप आहे, बुजगावणें आहे. त्याला आमच्यासारखे लोक भीक घालीत नाहीत.

*　　　*　　　*　　　*

आमच्या अेका आस्तिक मित्राला अेकदां अशी शंका आली की जग उत्पन्न करण्यापूर्वी ओश्वर अेकटाच असला पाहिजे. मग त्याला या नसत्या उठाठेवी सांगितल्या होत्या कोणी ? जग उत्पन्न करा, त्यांतल्या त्यांत माणसें उत्पन्न करा, त्यांत आत्मा घाला, त्यांच्यामागें पापपुण्य लावा, त्यांना शिक्षा किंवा बक्षिस देण्याकरतां स्वर्ग, नरक, रोगजंतु, धरणीकंप वगैरे भानगडी करा, यांत त्याला काय मिळालें ? आणि समजा कांही मिळालें असलें, तर त्याचा अर्थ असाच होत नाही का, की त्यापूर्वी ओश्वराला ही उणीव भासत होती ? ओश्वराला उणीव असणें शक्य आहे का ?

ही शंका त्याने आमच्या पुढें टाकली. आम्ही नास्तिक खरे, पण त्याच्या समाधानाकरतां ओश्वर गृहीत धरून तर्कशास्त्र चालवायला आमची मुळीच हरकत नव्हती. यामुळे आम्ही त्याला सांगितलें की ओश्वर कितीही परिपूर्ण मानला, आणि त्याला कसलीही उणीव असणें शक्य नाही असें जरी मानलें, तरी अेक उणीव तुम्हा आस्तिकांना देखील कबूल करावी लागेल. ओश्वराला स्तुतीची फार आवड आहे असें तुम्हीच म्हणतां. 'देव भावाचा भुकेला,' 'स्तुति करावी परमेश्वराची' वगैरे गोष्टी तुम्ही लहान मुलांना सांगतां, तेव्हां

तुमच्या मताने त्या खऱ्या असल्या पाहिजेत. मग ईश्वर जर अेकटाच असला तर त्याची स्तुति कोण करणार आणि भक्ति कोण करणार ? तेव्हां माणसें उत्पन्न करणें त्याला भागच होतें. त्याने मुकीं जनावरें उत्पन्न करून पाहिलीं, पण त्यांनी जरी कदाचित् मनांतून ईश्वराची भक्ति केली, तरी त्यांना कांही स्तुति करतां येत नाहीं ! तेव्हां माणसेंच केलीं पाहिजेत. बरें, त्यांना सुखी ठेवलें, तर तीं ईश्वराला विसरतील, तेव्हां त्यांना दुःखांतच ठेवणें भाग होतें, त्यांचा छळ करणें भाग होतें. 'सुख पाहतां जवापाडें, दुःख पर्वताअेवढें,' हें आस्तिकांनीच लिहिलेलें आहे. आतां तूं म्हणशील की मग ईश्वर थोडें तरी सुख कां देतो ? पण त्याचें कारण देखील उघड आहे. मनुष्याला जर मुळींच सुख दिलें नाही, तर तो अेकदम जीव देईल, मग तो स्तुति कशी करणार ? कां, पटतें की नाही ?

आमच्या मित्राला यावर कांहीच बोलणें शक्य नव्हतें. मनांतून तर आमचें म्हणणें पटलें, पण स्तुतीची आवड हा कांही मोठासा चांगला गुण म्हणतां येत नाही, आणि ईश्वराचा हा दोष आहे म्हणावें तर पाप लागतें, यामुळें तो कांहीच न बोलतां अेक मोठा सुस्कारा टाकून गप बसला.

---

# ग्रंथपरीक्षण

**समाजांतील भोळया समजुती** ( मेंदू आणि मन ), लेखक व प्रकाशक रा. ब. डॉ. द. ल. सहस्रबुद्धे, डी. अेस्‌सी., अेम्. अेजी., अेम्. अेस्‌सी., डेक्कन जिमखाना कॉलनी, पुणें–४. पृष्ठें १५१. किं. अडीच रु.

'धर्म या नांवाखालीं गैरसमजुतींचा नंगा नाच आज हजारों वर्षें चालू आहे. ईश्वर, आत्मा, मन ह्या सर्व कल्पना आहेत,' या प्रस्तावनेंतील पहिल्या वाक्यांवरून पुस्तकाच्या धोरणाची कल्पना येईल. हें सर्व पुस्तक आधुनिक ज्ञानावर आधारलेलें आहे. मन हें शरीरापेक्षा वेगळें नाहीं, हें सत्य अभ्यासानेंच

पटतें, कारण मनुष्याचा मोठेपणा मनावर अवलंबून असतो आणि मनच नाहीं म्हटलें म्हणजे सर्व माणसांचा दर्जा सारखा होअील, अितकेंच नव्हे तर आपल्यांत आणि अितर प्राण्यांत तरी फरक काय राहिला, असेंच बहुतेकांना वाटतें. परंतु मेंदू हा शरीराचा भाग आहे आणि आपण ज्याला विचार करणें म्हणतों, त्या मेंदूच्याच आपोआप घडणाऱ्या क्रिया आहेत किंवा प्रतिक्रिया आहेत, असें मानल्यावांचून गत्यंतरच नाही हें अभ्यासाने कळतें. या पुस्तकांत मेंदूच्या हालचाली कशा होतात हें सांगून नंतर प्राण्यांची वागणूक मेंदूने कशी ठरते हें सांगितलें आहे. निद्रा, स्वप्न, आभास, भुताटकी, उपजतबुद्धि, नियतिवाद, प्रयतिवाद, शकुन, मृतात्मे, वगैरे अितके विषय या पुस्तकांत आले आहेत की अेवढ्या लहान पुस्तकांत अितके विषय येतात कसे याचेंच आश्चर्य वाटतें. या सर्वांचें सविस्तर परीक्षण करूं गेल्यास अेक ग्रंथच लिहावा लागेल; परंतु कांहीं मुद्यांचा उल्लेख करणें जरूर आहे.

पान १३४ वर शेवटच्या परिच्छेदांत असें विधान आहे की ' वेळ शुभ किंवा अशुभ ठरवतांना आकाशांतील ग्रह आणि तारे यांच्या हालचालींवरूनच ठरविण्यांत येतात. या बाबतींत अनुभवाचाच उपयोग केला जात असला पाहिजे. कारण ग्रहांचा येथील वेळेच्या शुभ अशुभावर कसा काय परिणाम होतो यासंबंधाने कांही प्रयोग करून माहिती काढल्याचें कोणी सांगत नाही. ' यांतल्या पहिल्या दोन वाक्यांवरून बराच गैरसमज होण्याचा संभव आहे, कारण अनुभवावरून मिळवलेली माहिती खोटी असते असें नाही. वास्तविक अनुभवाने माहिती मिळाल्यावर पुराव्याची गरजच नसते. विस्तवाने हात भाजतो अेवढा अनुभव आला की त्याचीं शास्त्रीय कारणें पहात बसल्याशिवायच आपण तसें धरून चालतों. तेव्हां शुभ व अशुभ वेळा जर अनुभवाने ठरलेल्या असतील, तर फलज्योतिषाच्या खरेपणाबद्दल शंका घेतां येत नाही. परंतु लेखकाचा फलज्योतिषावर विश्वास असावा असें दिसत नाही. आणि वस्तुतः या गोष्टी अनुभवावरून ठरवलेल्या असतील असेंही दिसत नाही. समाजांतील भोळ्या समजुतींपैकीच ही अेक आहे. ती अनुभवावरून आलेली असणें शक्य नाही.

पान ४८ वरील विधान, ' म्हातारपणीं मेंदूची शक्ति कमी होते म्हणून अध्यात्म विषयाचें वाचन व वर्तन सुरू होतें. ' हें अर्थातच म्हाताऱ्यांना पटणार नाही, परंतु शास्त्रीय दृष्टया खरें आहे. म्हाताऱ्यांना वाटतें की आपण अनुभवाने शहाणे झालों म्हणून आपलीं मतें बदललीं. खरी स्थिति अशी असते की मरण जवळ आल्यामुळे नरकाची भीती वाटूं लागते आणि थोडाबहुत पुण्यसंचय करण्याची बुद्धि होते. पण पुण्य, पाप आणि नरक या सर्वच थापा आहेत हें माहीत असूनही कित्येकांना असें वाटतें की कदाचित् या गोष्टी खऱ्या असल्याच, तर थोडक्याकरतां तसा धोका कां पत्करा ? थोडेंसें पुण्य केल्यानें कांही बिघडत नाही. मेंदूची शक्ति कमी झाल्याचेंच हें चिन्ह आहे.

अेकंदरींत हें पुस्तक मनन करून वाचण्यासारखें आहे. पुष्कळांचें शास्त्रीय ज्ञान अर्धवट असतें आणि अशांच्या ज्ञानांत त्याने भर पडल्याशिवाय राहणार नाही.

र. धों. क.

---

# शारदेचें पत्र

कोल्हापूरच्या 'सत्यवादी'च्या गेल्या मेच्या अंकांत द्रौपदीसंबंधानें कांही विद्वानांचीं मतें दिलीं आहेत. पैकीं पंडित सातवळेकर म्हणतात, 'द्रौपदीनें पांच माणसांशीं विवाह केला असें म्हणण्याअैवजी ती पांच भावांशीं अेकाच वेळीं विवाहबद्ध झाली असें म्हणणें अधिक सयुक्तिक ठरेल.' यांतला फरक मला तरी समजत नाही. कदाचित् त्यांना असें म्हणायचें असेल की अेक आवडत नाही म्हणून दुसरा केला, दुसरा आवडत नाही म्हणून तिसरा केला, असें तिनें केलें नाही. हें खरें आहे. तिचा विवाह कोणाशीं व्हायचा, यांत तिच्या मताचा प्रश्नच नव्हता. तिचें स्वयंवर म्हणजे सीतेच्या स्वयंवरासारखेंच खरें स्वयंवर नव्हतें. बापानें कांहींतरी अट घालावयाची आणि ती पुरी करणाराला मुलगी द्यायची,

यालाच पूर्वी स्वयंवर म्हणत असत असें दिसतें. ही अट वास्तविक अर्जुनानें पुरी केली, तेव्हां द्रौपदी त्याचीच बायको व्हायची, पण पांडव हे हिमालयांत वाढलेले असल्यामुळे तेथल्या चालीप्रमाणें ती पांची भावांची बायको झाली. यांतही तिचें मत घेतलें नव्हतेंच, 'अधिकस्य अधिकं फलं' म्हणून तिने ते पांची कबूल केले अितकेंच. रूढीप्रमाणें होणाऱ्या गोष्टी बहुतेक सर्वांनाच कबूल कराव्या लागतात, तेव्हां यांत नवल नाही. पण सातवळेकरांनी याची जी आणखी अेक उपपत्ति सुचविली आहे ती मात्र सयुक्तिक दिसत नाही. ते म्हणतात, 'द्रौपदीचें लावण्य अप्रतिम होतें......अशी अप्रतिम सुंदरी केवळ एका अर्जुनाची पत्नी झाली असती तर बाकीच्या भावांना कदाचित् मत्सर वाटला असता. या मत्सराचा परिणाम कदाचित् घातकी ठरून पांडवांना कौरवांकडून आपलें राज्य परत मिळवतां आलें नसतें. ही आपत्ति टळावी म्हणून महर्षि व्यासांनी अैन वेळीं प्रगट होऊन द्रौपदीचा पांच पांडवांशीं विवाह करून देण्याबद्दल सर्वांचें मन वळवलें.' कल्पनेला कितीही ताण दिला तरी ही गोष्ट शक्य वाटत नाही. महर्षि व्यासांचें त्या काळीं कितीही वजन असलें तरी रूढीच्या सर्वथैव विरुद्ध असलेली गोष्ट वजनदार माणसाच्या सांगण्यानेच काय, पण राजसत्तेनं देखील करायला लावणें कठीण. शिवाय पांडव हे कर्तव्याला जागणारे होते असें महाभारतांत सर्वत्र गृहीत धरलें आहे. तेव्हां द्रौपदी अेका भावाची धर्मपत्नी झाल्यावर अितर भाऊ तिचा अभिलाष करतील, अशी कल्पना तरी महर्षि व्यासांच्या मनांत कशी आली? महाभारतांतल्या स्वभाव-चित्रणाला कांही अर्थच नाही का? ती आपल्या पतींशीं अनेक वेळां भांडली, पण मरतेवेळीं तिने पुढील जन्मीं आपल्याला हेच पांच पति असावे अशी प्रार्थना केली असें पंडितजी म्हणतात. म्हणजे पुढच्या जन्मीं पुनः महर्षि व्यासांना मध्यस्थी करण्याची वेळ येणार! तिनें आपल्या अनुभवावरून तशी प्रार्थना केली हें ठीक, पण तें जमणार कसें?

आपले देवही मोठे चमत्कारिक असतात. ते प्रसन्न होऊन वर देतात, पण त्यांत सुद्धां ते आपल्या भक्तांची जिरवायला पाहतात. मागितलेल्या

वराचा भलताच अर्थ करून ते 'तथास्तु' म्हणतात आणि मग गंमत पहात बसतात. दि. ब. जव्हेरी म्हणतात, 'पांच पतींशीं विवाह होण्याचें तिच्या ललाटीं लिहिलें होतें. पूर्वजन्मीं तिने तपश्चर्या करून आपल्याला चांगला पति मिळावा असा पांच वेळां शिवाकडे वर मागितला. शिवाने तिला पांच पति पाहिजेत असा अर्थ घेऊन 'तथास्तु' म्हटलें.' आणि मग तें तिच्या ललाटीं लिहून ठेवलें असें दिसतें! हें केव्हांसें लिहितात यासंबंधीं संशोधन करायला पाहिजे आहे. दि. ब. म्हणतात की 'त्या काळांत बहुभार्या पद्धति नव्हती.' यांत कांहीतरी चूक असली पाहिजे. कारण खुद्द पांडवांनाच द्रौपदीशिवाय आणखी बायका होत्या असें महाभारतांतच सांगितलें आहे. बहुधा अनेक पति करण्याची चाल नव्हती असें त्यांना म्हणायचें असेल, पण तशी चाल कोठेतरी असल्याशिवाय द्रौपदीचा असा विवाह होणें शक्य दिसत नाहीं. तिबेटांत अजूनही तशी चाल आहे आणि म्हणूनच सातवळेकरांनी पांडवांचा हिमालयाशीं संबंध जोडला आहे. द्रौपदीसंबंधी नवीन शोध लागतील तेवढे थोडेच. ती पांडवांची पत्नी नसून भीमाची उपपत्नी होती असेंही कोणीतरी लिहिलेलें मी वाचलें आहे! खरें काय होतें कोणास ठाऊक. अलीकडच्या अितिहासांतल्या महत्वाच्या गोष्टींसंबंधींसुद्धां खरें काय तें समजत नाहीं. मग महाभारताला फारतर अैतिहासिक कादंबरी म्हणतां येअील. त्यांतलें खरेंखोटें कसें समजावें? आनंदीबाअीने 'ध'चा 'मा' केला अशी असंभाव्य गोष्ट देखील आम्ही खरी मानीत आलों, पण खरोखरच 'ध' चा 'मा' करण्याचा कोणी प्रयत्न करून पाहिला तर तें शक्य नाहीं हें समजेल. पण भाऊबंदकी नाटकांत खाडिलकर देखील तेंच खरें धरून चालतात. तेव्हां महाभारताबद्दल लोकांनीं मनास येअील तें लिहिलें तर नवल काय?

तुझी **शारदा**

---

## अेजंटांचीं नांवें

मुंबई : श्री. विठ्ठल बाबू बागवे, न्यूज एजंट, दादर.

पुणें : अेल्. के. जोशी, बुकसेलर

कोल्हापूरः स्कूल ॲन्ड कॉलेज बुकस्टॉल.

बेळगांवः जे. एम्. माणूरकर खडे बाजार.

दक्षिण हैदराबादः महाराष्ट्र न्यूज एजन्सी.

इंदूरः पुरोहित ॲन्ड सन्स्.*

अहमदनगरः पी. जी. बापट, बुकसेलर, नवी पेठ.

कारवारः मुजुमदार आणि कसबेकर

सावंतवाडीः शिरोडकर ब्रदर्स.

निपाणी : के. एस्. बळगुर्गी

ग्वाल्हेर : डोके ब्रदर्स, लष्कर.

बेलापूर रोड : ना. अ. पेंडसे.

भुसावळ : पी. टी. पुराणिक.

उमरावती : अण्णा विठ्ठल काळे.

कराची : केसरकर ब्रदर्स.

यवतमाळ : राजाराम यादव मेश्राम, वंजारी फैल.

* येथें आमचा इतर मालही मिळेल.

## आमचेकडे मिळणारा माल

डच कॅप ( कांहीं आकार, येथे बनवलेले ) प्रत्यकीं, रु. ५.

उमट टोपी ( लहान, मध्यम किंवा मोठी ), प्रत्येकीं रु. २.

राअिट जेली ( आम्ही बनवलेली ), ... .... रु. ४.

राअिटचूब ( रोगप्रतिबंधाकरतां ) .... .... रु. १.

कामोत्तेजक नं. १ ( बरेच दिवस घेण्याकरतां ), रु. ४.

कामोत्तेजक नं. २ ( प्रसंगीं घेण्याकरतां ) .... रु. ६

कषायचूर्ण ( योनिमार्ग धुण्याकरतां सुवासिक, आकुंचक चूर्ण ), बाटली ... ... रु. २॥.

राअिट अेजन्सी, १३, नवी भटवाडी, मुंबई-४.



मुद्रण स्थळः—पॉप्युलर प्रिंटिंग प्रेस, १०३, ताडदेव रोड, मुंबई नं. ७

मुद्रक व प्रकाशकः—**रघुनाथ धोंडो कर्वे, राइट् एजन्सी,** नं. १३, नवी भटवाडी, गिरगांव, मुंबई.

Registered No. B. 2289.

राइट एजन्सी, नं. १३, नवी भटवाडी, मुंबई, नं. ४.

## प्रो. र. धों. कर्वे, एम्. ए. कृत इतर पुस्तकें

१. **आधुनिक आहारशास्त्र,** किं. १॥ रु., ट. ख. ५ आणे.
२. **आधुनिक कामशास्त्र** [ सचित्र ], तिसरी आवृत्ति
किंमत रु. २॥, ट. ख. ६ आणे.
३. **संततिनियमन** [ सचित्र ], ८ वी आवृत्ति,
किंमत १ रुपया, ट. ख. ४ आणे.
४. **गुप्त रोगांपासून बचाव** [ सचित्र ], ३ री आ.
किंमत १२ आणे, ट. ख. ४ आणे.
५. **'समाजस्वास्थ्य'** मासिकांतील निवडक लेख,
भाग १ ला [पहिलीं तीन वर्षें], खलास आहे.
भाग २ रा [वर्षें ४–५–६], किं. २–०–०, ट. ख. ५ आ.
६. **त्वचेची निगा.** किं. ८ आ., ट. ख. ४ आ.
७. **गुरुबाजी** (नाटक ) किं. ८ आणे, ट. ख. ४ आणे.
८. **वेश्याव्यवसाय,** किं. २ रु., ट. ख. ५ आ.
९. **तेरा गोष्टी,** किं. १ रु., ट. ख. ४ आ.

### डॉ. के. भा. लेलेकृत

१. **बाहेरख्यालीचे दुष्परिणाम,** २ री आ., किं. ३ आ.
२. **मूळव्याध.** किं. २ आ.

### श्री. भास्कर धोंडो कर्वे, एम्. एड्. कृत,

१. **मी कसा झालों ?** किं. ८ आ., ट. ख. ४ आ
२. **बालमनाचें रहस्य,** किं. रु. १।, ट. ख. ५ आणे.

### प्रो. धों. के. कर्वे कृत

**संक्षिप्त आत्मवृत्त,** किं. १२, ट. ख. ५ आ.

> अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणारांच्या मनाचा गुण होय.

वर्ष १८ वें अंक २-३-४

# स मा ज स्वा स्थ्य

आगस्ट-सप्टेंबर-आक्टोबर १९४४.

किंमत २ आणे

## अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १ वर्गणीदारांस सूचना ... ... ... | ११ |
| २ मानसशास्त्राचें थोतांड ... ... ... | १२ |
| ३ ग्रंथपरीक्षण ... ... ... .... | १७ |
| ४ बळजबरीचे खोटे आरोप ... ... ... | १९ |
| ५ शारदेचें पत्र ... ... ... ... | २० |


# वर्गणीदारांस सूचना

सरकारने उदार होऊन जेमतेम सोळा पानांचा अंक काढतां येईल इतक्या कागदाची परवानगी दिली आहे. हा हुकूम बदलेपर्यंत सर्व अंक सोळापानी निघतील आणि त्यांचें स्वरूपही असेंच राहील, कारण सचित्र दर्शनी पृष्ठ ठेवल्यानें मजकुराची जागा कमी होते आणि आमचे मतें मजकूर अधिक महत्वाचा आहे. या अंकावर जरी आगस्ट-सप्टेंबर-आक्टोबर असें लिहिलें आहे, तरी हा अेकाच महिन्याचा अंक धरून प्रत्येक वर्गणीदाराची मुदत दोन महिन्यांनी वाढवली आहे. हा हुकूम फार दिवस चालेल असें दिसत नाही,

तेव्हां वर्गणींत फरक केलेला नाहीं. पुढें जास्त पानें देऊन भरपाओ करूं. जून किंवा जुलैच्या अंकाबरोबर ज्यांची वर्गणी संपली आहे, त्यांकडे हा अंक व्ही. पी. ने जात आहे आणि त्यांची वर्गणी सप्टेंबर व आक्टोबरपासून धरूं.

संपादक.

---

# मानसशास्त्राचें थोतांड–१

येथें नुकतेंच अेका साहित्यिकांच्या सभेंत अेकानें विधान केलें की प्रो. वा. म जोशी हे मानसशास्त्रज्ञ होते आणि मानसशास्त्राचा अभ्यास ज्यानें केलेला नाही त्याला त्यांच्या वाङ्मयाचा समर्पक विचार करतां येणार नाही. या विधानांत कितपत तथ्य आहे हें पाहणें जरूर आहे. याकरतां वामनरावांना मानसशास्त्र अवगत होतें की काय अशी शंका न घेतां मानसशास्त्र नांवाचें अेखादें शास्त्र असूं शकतें काय, याचा विचार या लेखमालेंत कर्तव्य आहे. अर्थात् तसें शास्त्रच नसल्यास तें कोणाला अवगत असणेंच शक्य नाही व त्याचा अभ्यासही करतां येणार नाही, असा निष्कर्ष निघेल, पण त्याला आमचा अिलाज नाही. फ्रँक केनियन यांच्या 'मिथ ऑफ द माइंड' या पुस्तकाचा या लेखमालेंत उपयोग केला आहे.

मानसशास्त्र असा शब्द वापरांत आहे, त्याला कांही अर्थच नाही काय, असें कदाचित् कोणी विचारील. तेव्हां याचाच प्रथम विचार करूं. मानसशास्त्र म्हणजे मनाचें शास्त्र. अिंग्रजींत याला सायकॉलजी म्हणतात आणि याचा मूळ अर्थ आत्म्याचें शास्त्र. मन हा शब्द आत्मा या अर्थानेंच वापरतात, तेव्हां यांत वाटतो तितका घोटाळा नाही. आत्मा म्हणजे शरीराचा उपयोग करून घेणारा, पण शरीरापेक्षा वेगळा, असा कोणीतरी असतो आणि मानसशास्त्राचें 'मन' देखील तशाच प्रकारचें असतें. तेव्हां त्यांत फरक काय राहिला? बुद्धिवादी लोक आत्मा मानीत नाहीत, पण मन वेगळें आहे असें पुष्कळ वेळां मानतात, याचें कारण अितकेंच की ते याचा पुरेसा विचार

करीत नाहीत. आत्मा मानायला जसा पुरावा नाही, तसाच मन मानण्यालाही नाही. तरीपण मनाचा शरीरावर परिणाम, शरीराचा मनावर परिणाम, वगैरे प्रकारची भाषा बहुतेकांच्या अितकी अंगवळणीं पडलेली असते की याच्या मुळाशीं मनाच्या वेगळेपणाची कल्पना आहे याचा विचारच कोणी करीत नाही. पण मन म्हणा किंवा आत्मा म्हणा, असें शरीराहून वेगळें कांहीतरी आहे, याबद्दल कोणताही पुरावा कोणी दिलेला नाही.

अितकें मात्र खरें की मानसशास्त्र असें अेक शास्त्र पुष्कळ लोक मानीत आले आहेत, अमुक विद्वान लोक त्यांतले तज्ञ समजलेले आहेत, आणि ते आपल्या विषयाच्या महत्वाची घोषणा करीत आलेले आहेत. शिक्षकांना तर मानस-शास्त्राशिवाय पाऊल टाकतां येणार नाही असें मानून शिक्षकांवर हा विषय सक्तीने लादलेला आहे. पण धार्मिक शिक्षण पाहिजे म्हणणारांना जसें धर्म म्हणजे काय हें निश्चितपणें सांगतां येत नाही, त्याचप्रमाणें मानसशास्त्राचीही स्थिति आहे. धर्मांत जशीं मतमतांतरें सांपडतात, तशींच यांतही सांपडतात, आणि दोहोंचें कारण अेकच आहे. धर्म हा अीश्वर व आत्मा या काल्पनिक गोष्टींवर उभारलेला असतो, आणि मानसशास्त्राचा पाया म्हणजे मन, हेंही तितकेंच काल्पनिक आहे. तेव्हां या दोन्ही विषयांत पाहिजे त्याला पाहिजे तीं विधानें करायला पूर्ण मुभा असते. अीश्वरासंबंधी जशी निश्चित माहिती कोणालाही नसते ( असणार कशी ? ), तशीच मनासंबंधीही नसते.

मनाच्या अस्तित्वासंबंधी ही शंका नवीनच उत्पन्न झाली आहे असें नाही. शोपेनहावर हा प्रसिद्ध तत्वज्ञ १८६० सालीं वारला, त्यानें म्हटलें आहे की मानसशास्त्राचा अभ्यास फोल आहे, कारण मन असें कांही नाहीच. विल्यम जेम्स हा मोठा मानसशास्त्रज्ञ समजलेला आहे आणि त्याने ‘ प्रिन्सिपल्स ऑफ सायकॉलजी ’ नांवाचा अेक प्रसिद्ध ग्रंथही लिहिलेला आहे, पण त्याचीही नंतर खात्री होऊन त्यानें स्वतः आपल्या या प्रसिद्ध ग्रंथाला पोकळ फुगा म्हटलेलें आहे. अर्थात् अितका प्रामाणिकपणा सर्वांत नसतो, याचें कारण उघड आहे. मानसशास्त्रच संपल्यावर त्यांचें काय महत्व राहिलें ?

मन हा अेक सोअीस्कर शब्द आहे, पण त्यावरून मन असें वेगळें कांही आहे असें मानणें चूक होअील. अशीच चूक निसर्ग या शब्दाचे बाबतींत नेहमी होत असते. कांही घटनांना व नियमांना आपण नैसर्गिक म्हणतों आणि यामुळे कांहीं लोक निसर्गासंबंधी अशा भाषेंत बोलतात की जणूं काय निसर्ग ही कोणी व्यक्ति आहे, तिने कांही नियम केलेले आहेत, आणि ते आपण मोडले तर निसर्गाला राग येऊन तो आपल्याला शिक्षा करतो. खरें पाहिलें तर निसर्गाचे नियम मोडतां येण्यासारखे नसतात. आपल्या सोयीकरतां आपण निसर्ग हा शब्द वापरतों, पण त्याला आपल्या कल्पनेबाहेर अस्तित्व नाही आणि तो कोणाला शिक्षाही करीत नाही.

आत्म्यासंबंधी जुन्या कल्पना अैकून आतां आपल्याला हंसूं येतें. आत्मा शरीरांत राहतो, पण तो जड नसल्यामुळे त्याला रहायला जागा लागत नाही असें अेक मत आहे, परंतु तो विशिष्ट स्थानीं असतो असेंही अनेक तत्वज्ञांनी मानलेलें आहे. देकार्त हा शास्त्रज्ञ होता, पण तो आत्मा मानीत असे आणि त्याचें स्थान म्हणजे मेंदूंत 'पिनिअल ग्लँड' नांवाची जी वाटाण्याअेवढी वाटोळी ग्रंथि असते, ती मानीत असे. या ग्रंथीचें कार्य अजूनही समजलेलें नाही, तेव्हां अशा कल्पनेला जागा होती व आहे, पण ती केवळ कल्पना आहे.

खरें पाहिलें तर मेंदूंत ज्या क्रिया व प्रतिक्रिया अेकसारख्या चालू असतात, त्यांपैकी कांहींची आपल्याला जाणीव होते व या क्रियाप्रतिक्रियांना आपण मानसिक घटना म्हणतों, पण मनाचें वेगळें अस्तित्व मानायला अेवढें कारण पुरेसें नाही. पचन हें शरीराचें एक कार्य आहे, पण आपण पचनाचें वेगळें अस्तित्व मानीत नाहीं. झोप हें अेक कार्य आहे, परंतु तिचेंही वेगळें अस्तित्व मानीत नाही. मन वेगळें मानण्याचें कारण अेकच, की आत्मा मानण्याची जुनी प्रथा आहे आणि ती जरी आपण सोडून दिली तरी तिचाच परिणाम म्हणून कांही लोक मन मानतात. पण कारणाशिवाय कशाचेंही अस्तित्व मानणें हें शास्त्रीय पद्धतीला धरून नाही. मनाला असें आध्यात्मिक स्वरूप आल्यामुळेच हा मानसशास्त्राचा घोटाळा उत्पन्न झाला आहे, आणि त्यांत कोणत्याही बाबतींत अेकमत

होत नाही. अेडना हाअिडब्रेडर यांनी १९३३ सालीं ' सात मानसशास्त्रें' नांवाचें अेक पुस्तक लिहिलें आहे व त्यांत असा खुलासा केला आहे की परस्परविरोधी अशा अनेक विचारप्रणालींतून या सातांची निवड केलेली आहे.

असें होण्याचें कारण कित्येक असें सांगतात की हें शास्त्र अजून बाल्यावस्थेंत आहे आणि सर्वच शास्त्रें प्रथम कल्पनाशक्तींतूनच निघतात. पण केवळ कल्पना म्हणजे शास्त्र नव्हे. त्यांतला काल्पनिक भाग काढून टाकल्यावर जें शिल्लक राहील त्यालाच शास्त्र म्हणतां येअील. पण मानसशास्त्रांत सर्वच काल्पनिक असल्यामुळे शिल्लक कांहीच रहात नाही ! मानसशास्त्रांत बाबावाक्याशिवाय कशाचाही आधार नाही, आणि म्हणूनच त्यांत अनेक पंथ निर्माण झालेले आहेत. रसायनशास्त्रांत असे पंथ नाहीत, कारण तें खरें शास्त्र आहे. मानसशास्त्रांतल्या प्रत्येक पंथाचीं मतें वेगळीं, व्याख्या वेगळी, पद्धती वेगळया. अेक पंथ मानसशास्त्राला जाणिवेचें शास्त्र म्हणतो, दुसरा वागणुकीचें शास्त्र म्हणतो. या पंथांची संख्या अेकसारखी वाढत आहे.

वर्तनशास्त्र ( बिहेव्हिअरिझम् ) हा जरी मानसशास्त्राचाच अेक प्रकार समजतात, तरी त्याचे पुरस्कर्ते त्यांत आत्म्याचा किंवा मनाचा संबंध आणीत नाहीत, तेव्हां त्याला मानसशास्त्र म्हणणेंच योग्य नाही. मन हें अमूर्त व अपार्थिव मानल्यास त्याचें शास्त्रच होऊं शकत नाही. मानसशास्त्रांतला कोणताही सिद्धांत म्हणजे शास्त्रीय पुराव्याने ठरलेला नसून कोणीतरी ठोकून दिलेलें मत असतें. त्याला कोणताही पुरावा नसतो.

याचा अेवढा ऊहापोह करण्याचें कारण म्हणजे या तथाकथित शास्त्रापासून मोठा धोका उत्पन्न झालेला आहे, कारण याचे प्रचारक आपआपलीं बाबावाक्यें सांगून गप्प बसत नाहीत, तर तीं वाक्यें सर्वत्र लागू केलीं पाहिजेत असा आग्रह धरतात. कायदा, उद्योगधंदा, शिक्षण, अध्यापन, सैन्य, आरमार, वगैरे सर्व बाबतींत त्यांनीं धुमाकूळ मांडला आहे. विशेषतः शिक्षणाच्या बाबतींत हें तथाकथित शास्त्र शिक्षकांच्या डोक्यावर बसूं पहात आहे. आजपर्यंत शिक्षक अनमानधपक्याने शिकवीत होते, आतां या शास्त्राच्या साह्याने

त्यांना निश्चित पद्धतीने शिकवतां येईल, असें याचे पुरस्कर्ते म्हणतात. पण ज्या शास्त्रांतच कांही निश्चित नाही, त्यांतून निश्चित पद्धत कशी निघणार ?

अनेक प्रकारच्या वैदूंनी या तथाकथित शास्त्राचा उपयोग थापा देऊन पैसे कमावण्याकडे केला आहे. काळजी विसरा, पैसे मिळवा, सुखी व्हा, आपली स्मरणशक्ति वाढवा, आणि हें सर्व करण्यास आम्ही तुम्हाला मानसशास्त्राच्या जोरावर शिकवतों, मात्र आमची फी अगोदर टाका. अशा जाहिराती देऊन आज कितीतरी लोक प्रतिष्ठित ठगांचा धंदा करीत आहेत. स्मरणशक्ति काय किंवा पैसा कमावण्यास लागणारें कौशल्य काय, हें सर्व मेंदूवर व मज्जातंतूंवर अवलंबतें आणि त्यांत कोणीही भर टाकूं शकत नाहीं. मन हें सर्वस्वी शरीरावर अवलंबून आहे. कित्येक डाक्तर मानसशास्त्राच्या जोरावर उपदेश करीत असतात की युद्धकालांत आशावादी असावें, चिंता करूं नये, पण हा सर्व उपदेश करायला मानसशास्त्र कशाला पाहिजे ?

कँट या तत्ववेत्त्याने अठराव्या शतकांत भविष्य केलें होतें की मानसशास्त्र हें कधीही शास्त्राच्या पदवीला पोंचणें शक्य नाही. याचें कारण असें की ज्या विषयाला गणित लावतां येत नाहीं, त्याचें शास्त्र होऊं शकत नाही. त्याने गणितज्ञांना आव्हान दिलें कीं त्यांनी मानसशास्त्राला गणित लावून दाखवावें. यावर १८३४ सालीं वेबर याने असें लिहिलें की उच्च मानसिक व्यापार जरी गणिती पद्धतीने मोजतां येत नाहीत, तरी इंद्रियद्वारा मिळणाऱ्या संवेदना मोजतां येतील. हा प्रश्न पुढें फेक्नरनें हातीं घेऊन असा सिद्धांत ठोकून दिला कीं उत्तेजक कारण जर भूमितिश्रेढीप्रमाणें वाढलें, तर त्याने उत्पन्न होणारी चेतना गणितश्रेढीने वाढते. यावर अनेक शास्त्रज्ञांनी विरोधी टीका केली आणि याचें कारण उघडच आहे. प्रकाश दुप्पट झाला हें आपल्याला सांगतां येतें, पण त्याचा डोळ्यांवर परिणाम किती प्रमाणांत वाढला हें कसें सांगतां येईल ? आणि समजा तेंही सांगतां आलें, तरी डोळे हा शरीराचा भाग आहे. त्याचा मानसिक परिणाम कसा मोजणार ? आणि तो मोजतां न आला तर मानसशास्त्राचा कसा संबंध येतो ?

शिवाय अेका मनुष्याच्या बाबतींत कांही प्रमाण बसवतां आलें असें धरून चाललें, तरी तोंच नियम अितरांना कसा लावतां येअील ? या गोष्टी मज्जातंतूंवर अवलंबतात आणि ते सर्वांचे सारखे नसतात. अितकेंच काय तर या बाबतींत एका मनुष्यांतही फरक पडत असतो. तो क्षणोक्षणीं बदलत असतो हें कोणास सहज न दिसलें, तरी लहानपणीं, तरुणपणीं, किंवा म्हातारपणीं त्याची संवेदना-शक्ति सारखी रहात नाही हें तर सर्वांना समजण्यासारखें आहे ? तेव्हां जो नियम अेका मनुष्याला देखील नेहमी लावतां येणार नाही, तो अनेकांना लावूं पाहणें हास्यास्पद नाहीं काय ? यांत जिवंत माणसांचा संबंध आहे आणि प्रयोग चालू असतांना देखील जर मनुष्य बदलतो, तर नियम बसवतांच येणार नाही. ( अपूर्ण ).

---

# ग्रंथपरीक्षण

१ **चला लढाअीवर** ( तीन अंकीं नाटक ) लेखक, भा. वि. वरेरकर, प्रकाशक, नवभारत प्रकाशन संस्था, मुंबई-४. पृष्ठें ९२. किंमत रु. १॥.

मागील युद्धांत पराक्रम केलेले मेजर सर सोमनाथ आणि त्यांची मर्दानी मुलगी चंदा सर्वांना लढाअीवर जाण्याचा उपदेश करीत असतात. सर सोमनाथ यांना प्रथम ज्या दिवशीं गोळी लागली त्या दिवशीं जन्म झालेल्या मुलीकरतां जाहिरात देऊन यांनी कृपाशीं दुसरें लग्न केलेलें असतें आणि कृपेचें लग्न खंडेराव नांवाच्या तरुणाशीं ठरलेले असतांही ती जाहिरातीला उत्तर देऊन लग्नाला तयार झालेली असते. या दोघांनीही हा मूर्खपणा कां केला हें समजणें कठिण आहे. खंडेराव सरसाहेबांची कारकुनी पतकरतो आणि कृपेबरोबर पळून जाण्याचा बेत करतो आणि चंदा त्यांना साथ देते. याशिवाय पुष्पा नांवाची कृपेची दूरची नातेवाअिक सरसाहेबांकडेच राहते आणि कॅप्टन शंकरराव गोखले लढाअीवरून रजेवर येऊन सरसाहेबांकडे नेहमी येतात. सर सोमनाथ चंदेचें लग्न त्यांच्याशीं जमवूं पाहतात, पण तें जमत नाही आणि ते

कृपेशीं फाजील लगट करून थप्पड खातात. याशिवाय नाटकांत बरेच कारकून आहेत आणि अेकंदरींत नाटकाचा रोख असा आहे की पांढरपेशांनी नुसती चर्चा करण्याअैवजी प्रत्यक्ष लढाअीवर जावें. शेवटीं खंडेरावाचा कृपेबरोबर पळून जाण्याचा बेत फसतो आणि तो मात्र लढाअीवर जातो आणि चंदा त्याची वाट पाहण्याचें त्याला आश्वासन देते. नाटकांतील संभाषणें चटकदार आहेत, परंतु सर सोमनाथांचें पात्र पटण्याजोगं नाही. ८ व्या पानावर, 'मोठा अभिमान आहे मला माझ्या मिशांचा. फौजेंत या मिशांच्या रुबाबावरच मी मारून नेत होतों,' पान ९ वर पुनः, '(मिशांवर ताव देऊन) हो. या ध्यानीं घे,' हीं भाषणें प्रहसनाला शोभलीं असतीं, पण नाटकांत शोभत नाहीत. त्यांची लग्नाची जाहिरातही चमत्कारिकच आहे. अशा रीतीने या पात्राची चेष्टा झाल्यामुळे त्याने केलेल्या प्रचारालाही कमीपणा आला आहे. पान २५ वर 'चैनीची अेकदां भरपूर करून घ्यावी,' येथें 'भरपूर' हा शब्द नामासारखा वापरला आहे, तें कानाला चमत्कारिक लागतें. नाटकांत तीन पद्यें आहेत, पैकी नाटकाचा प्रारंभ आणि शेवट अेकाच पद्याने होतो. **र. धों. क.**

**२. न मागतां** (तीन अंकी नाटक), लेखक, भा. वि. वरेरकर, प्रकाशक, नवभारत प्रकाशनसंस्था, मुंबई–४. पृ. ६२. किंमत १ रु.

दत्ता आणि हेमंत हे दोन स्नेह्यांचे औरस मुलगे, रमा आणि सीता या त्यांच्या अनौरस मुली, दत्ताचा बाप अण्णासाहेब, आणखी अेका स्नेह्याची मुलगी तारा, आणि कांग्रेसचा गुप्त कार्यकर्ता बॅरिस्टर पंढरीनाथ, अितकीं मुख्य पात्रें या नाटकांत आहेत. अण्णासाहेबांनी रमाला आपली औरस मुलगी म्हणून घरींच ठेवल्यामुळे दत्ता संतापून घर सोडून निघून जातो आणि दहा वर्षांनी परत येतो, येथून नाटकाला सुरवात झाली आहे. त्याच वेळी पंढरीनाथ तुरुंगांतून सुटून येऊन त्यांच्याकडे पांढ्र गडी होऊन कामाला राहतो. हेमंत सेक्रेटेरिअटमधें नोकर आहे आणि अण्णासाहेबांनी त्याच्याशीं रमेचें लग्न ठरवलेलें आहे. रमेच्या नांवाने त्यांनी अर्धी मिळकत करून ठेवली आहे म्हणून हेमंत लग्नाला तयार झाला आहे. हेमंतच्या बापाने सीतेची कांहीच विचारपूस न केल्यामुळे

तिचा खर्चही अण्णासाहेबच चालवतात व ती त्यांच्याकडे नेहमी येते. दत्ताचें व ताराचें लग्न जमतें, परंतु तिच्या अनौरसपणाचा स्फोट सीतेने केल्यामुळे तें शेवटीं फिसकटतें. हेमंत सीतेला कलावंतिणीची पोर म्हणून हिणवीत असतो, पण 'मी तुझ्याच बापाची मुलगी आहें आणि रमा ही माझी मावसबहीण असून माझ्यासारखीच अनौरस आहे,' असें तिनें सांगितल्याबरोबर चिडतो आणि पांडू हा कांग्रेसवाला असल्याचा त्याला अंदाज लागल्यामुळें तो पोलीसला कळवतो. अिकडे रमेचें लग्न फिसकटल्यामुळें ती हिरमुसली होते, तेव्हां कुलीन कुणबी चालत असेल तर मी लग्नाला तयार आहें, असें पांडू म्हणतो आणि ती कबूल करते. अितक्यांत पांडूला पकडायला पोलीस आल्यामुळे तो बॅरिस्टर पंढरीनाथ आहे हें समजतें व पोलीस त्याला घेऊन जातात. येथें नाटक संपतें. आण्णासाहेबांखेरीज बाकीच्या पात्रांचा स्वभावपरिपोष चांगला साघला आहे. अण्णासाहेब मात्र केवळ अनौरस मुलीचें कुलीन घराण्यांत लग्न करून देण्याकरतां हेमंतला पसंत करतात हें ठीक दिसत नाही. अेकतर ही फसवणूक, आणि शिवाय हेमंतच्या बापाने सीतेला न पोसल्यामुळे त्याची अण्णासाहेबांना शिसारी आली आहे असें वाक्य नाटकांत आहे. तेव्हां हें चमत्कारिक दिसतें. या नाटकांत सात पद्यें आहेत. र. धों. क.

---

# बळजबरीचे खोटे आरोप

अेखाद्या स्त्रीनें विनयभंगाचा आरोप कोणावरही केला तर तिचें म्हणणें खरें मानण्याची मॅजिस्ट्रेटांची प्रवृत्ति असते. बळजबरीचा आरोप यापेक्षा गंभीर स्वरूपाचा आहे आणि अमेरिकेंतील कित्येक संस्थानांत या गुन्ह्याबद्दल मृत्यूची शिक्षा होते. परंतु हे आरोप पुष्कळ वेळां खोटे असतात हें पुष्कळांना माहीत नसतें. ज्याने स्वतःच्या अब्रूला धक्का लागेल असा आरोप खरा असल्याशिवाय कोणतीही स्त्री करणार नाही, असें मॅजिस्ट्रेट धरून चालतात. हल्ली अिंग्लंडांत असलेल्या अमेरिकन सैन्यांत अमेरिकन कायदा लागू असल्यामुळे अशा आरोपां-

वरून कित्येकांना देहांत शासन झालेलें आहे. या बाबतींत क्लिफर्ड ॲलन नांवाच्या गृहस्थांनी ' न्यू स्टेट्स्मन् ॲंड नेशन ' मधें प्रसिद्ध झालेल्या अेका पत्रांत म्हटलें आहे की 'कांही स्त्रिया असे आरोप केवळ प्रसिद्धीच्या अिच्छेने करीत असतात. मानसिक रोगांचा तज्ज्ञ या दृष्टीने माझ्या पाहण्यांत अशा स्त्रिया आल्या आहेत. अशा स्त्रियांत दुसरें कांही रोगचिन्ह सांपडेलच असा नियम नसतो, यामुळे त्यांचें म्हणणें खरें वाटतें. ' अेका स्त्रीने असे आरोप दोन माणसांवर वेगवेगळ्या वेळीं केले व त्या दोन्ही माणसांना शिक्षा झाली. अमेरिकन कायद्याखाली हीं दोन माणसें निष्कारण प्राणाला मुकलीं असतीं. या स्त्रीने तिसऱ्यांदां जेव्हां असाच आरोप आणखी अेका माणसावर केला, तेव्हां मॅजिस्ट्रेटालाही विचार पडला की याच बाअीवर लोक अेकसारखे बळजबरी कां करीत असतात ? शेवटीं त्या स्त्रीची वेड्यांच्या अिस्पितळांत रवानगी झाली आणि तेथे ती ॲलन यांच्या दृष्टीस पडली. पूर्वींचे दोन आरोपही खोटेच होते, पण त्या दोन आरोपींची १ वर्षाची व १८ महिन्यांची शिक्षा भोगून झाली होती, तेव्हां ' त्यांचें दुर्दैव ! ' म्हणून स्वस्थ बसण्यापलीकडे कांहीं करणें शक्य नव्हतें, असें ते म्हणतात. वास्तविक अशा वेळीं आरोपींना सरकारकडून नुकसानभरपाअी मिळाली पाहिजे, कारण न्याय देणें हें सरकारचें काम असतें. ते निर्दोष आहेत असें म्हटल्याने कदाचित् अब्रूची नुकसानी भरून येअील, पण निष्कारण तुरुंगांत काळ काढावा लागल्याने आणखीही अनेक प्रकारचें नुकसान होतें, त्याची वाट काय ? आणि अशा वेळीं स्त्रियांची बाजू घेणाऱ्या मॅजिस्ट्रेटांनी देखील थोडाबहुत विचार करण्यासारखी ही गोष्ट आहे, पण ' विद्वान ' मॅजिस्ट्रेटांना अक्कल कोणी शिकवावी ?

---

# शारदेचें पत्र

बऱ्याच दिवसांपूर्वी अकोल्याच्या ' मातृभूमि ' मधें पां. वा. गाडगीळ यांचें एक व्याख्यान छापलें होतें. तें जरी आतां जुनें झालें आहे तरी त्यांतली

हिंदु विचारसरणी पहाण्यासारखी आहे. गाडगीळ आपल्याला मार्क्सवादी म्हणवतात, पण ते खरे जातीचे हिंदु आहेत असें या व्याख्यानावरून दिसतें. आतां या दोहोंची सांगड कशी घालायची ? कारण मार्क्स तर म्हणतो की 'धर्म ही लोकांना गुंगी आणणारी अफू आहे.' या वाक्यापासूनच त्यांनी सुरवात केली आहे, पण पुढच्याच वाक्यांत अशी अेक कोलांटउडी मारली आहे की तिच्या समर्थनाकरतां सबंध व्याख्यान खर्ची पडलें आहे. शिवाय समर्थन झालें नाही तें नाहींच ! पुढचें वाक्य असें. 'परंतु तेवढ्यावरून मार्क्स किंवा त्याचे अनुयायी धर्मविचाराचे शत्रु होते असें म्हणतां येणार नाही.'

मग मार्क्स असें कां म्हणाला ? याचें कारण गाडगीळ असें सांगतात की मार्क्सच्या पुढें त्या वेळीं हिंदु धर्म नव्हता. झालें ! सोपी युक्ति आहे. हिंदु धर्माचाही दोष टळला आणि मार्क्सचाही टळला. हिंदु धर्मांत असें विशेष काय आहे की त्यामुळे हिंदु धर्मच तेवढा मार्क्सच्या वाक्याला अपवाद ठरेल ? वास्तविक हिंदुधर्मांत असें वैशिष्ट्य कांहीच नाहीं. मार्क्सने धर्माला अफू कां म्हटलें याचा फारसा विचार गाडगिळांनी केला दिसत नाही. धर्माची शिकवण अशी असते की ऐहिक सुखाची मोठीशी मातब्बरी नाहीं, आयुष्यांत आपले कितीही हाल झाले तरी हरकत नाही, मेल्यावर आपल्याला त्याचा खरा मोबदला मिळणार आहे, तेव्हां ओश्वर ज्या स्थितींत आपल्याला ठेवील त्या स्थितींत समाधान मानून राहणें अेवढेंच आपलें कर्तव्य आहे. हिंदु धर्मांतही अैहिक सुखाला महत्त्व नाहीं असेंच सांगितलेलें आहे. हे विचार मनुष्याच्या मनांत ठाम झाले म्हणजे मनुष्य स्वतःच्या उन्नतीकरतां कोणताही प्रयत्न करीत नाही, कारण धर्माच्या शिकवणीने त्याच्या मनांत अैहिक सुखाचे बाबतींत उदासीनता निर्माण होते आणि मार्क्सला ती नको होती, कारण गरीब मजूर वर्गाच्या अैहिक उन्नतीकरतां त्याचा सगळा प्रयत्न होता. तेव्हां हिंदुधर्माचे बाबतींत मार्क्सने अपवाद केला असता असें मला तर वाटत नाही. गाडगिळांना तसें वाटतें, याचें कारण ते मार्क्सवादी म्हणवून घेत असले तरी ते अजून हिंदुच आहेत.

ते म्हणतात, 'भगवद्गीतेंतल्या दहापांच श्लोकांचें पुनः पुनः मनन केल्यास मनाला कवढा धीर येतो याचा अनुभव पाहण्यासारखा आहे.' धर्माने मनुष्याची विचारशक्ति नाहीशी होते याचा हा पुरावा आहे. गीतेंत सगळाच गोंधळ असल्यामुळे त्यांतून कोणालाही आधार मिळतो. गाडगिळांची मजल येथपर्यंत पोंचली आहे की, 'आमचा हिंदुधर्म अत्यंत प्राचीन असल्यामुळे त्यांत अनेक परिवर्तनें होऊन तो सामाजिक हिताच्या दृष्टीने प्रतिष्ठित झालेला आहे. कार्यकारणभावाचा आधुनिक शास्त्रीय सिद्धांत हाच आमच्या हिंदु सामाजिक धर्माचा मूळ पाया आहे.' याला आधार म्हणून त्यांनी भगवद्गीतेंतलीं कांही वाक्यें दिलीं आहेत. पण त्याच भगवद्गीतेंत **अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक्। साधुरेव स मंतव्यः सम्यग्व्यवसितो हि सः॥**(९·३०) हाही श्लोक आहे.(म्हणजे मनुष्य कितीही दुराचारी असला तरी त्याची माझ्यावर अनन्य भक्ति असेल तर तो साधुच समजावा.). **मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयः। स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यांति परां गतिम्॥** (९·३२) (माझी भक्ति केल्याने स्त्रिया, वैश्य आणि शूद्र यांना देखील उत्तम गति मिळते.) यावरून असें स्पष्ट ध्वनित केलें आहे केलें आहे की ब्राह्मण आणि क्षत्रिय या वर्गांतले पुरुष मात्र श्रेष्ठ, आणि सर्व स्त्रिया, वैश्य आणि शूद्र कनिष्ठ आहेत. आणि तरीदेखील गाडगीळ म्हणतात 'सामाजिक हिताच्या दृष्टीने हिंदु धर्म प्रतिष्ठित झालेला आहे.' चातुर्वर्ण्य ईश्वराने निर्माण केलें असें गीतेंत सांगितलें आहे. त्याच चातुर्वर्ण्यावरून आज जातिभेद निर्माण झाले आहेत. शूद्रांचा धर्म म्हणजे इतर तीन वर्गांची सेवा करणें होय, असेंही गीतेंतच सांगितलें आहे. यांत कार्यकारणभाव कोठेसा आहे तो मला दिसत नाही. दुराचारी माणसांना नेहमीच शिक्षा होते असें नाही, हें सर्वांना दिसतें, पण निदान ते पापी असल्यामुळे मेल्यावर तरी त्यांना शिक्षा होईल असें धर्मांत सांगितलेलें असतें. पण आमचा हिंदु धर्मच कांहीं और आहे! त्यांत दुराचारी माणसांना देखील साधु मानावें असें सांगितलें आहे. श्रीकृष्णाची भक्ति केली म्हणजे अशा माणसांना देखील मुक्ति मिळते, मग गाडगिळांचा

कार्यकरणभाव कोठे बाकी राहिला ? हिंदुधर्मांत तेवढा शास्त्रीय ज्ञानाचा आधार मानलेला कार्यकारणभाव आहे असें म्हणणें म्हणजे निव्वळ थापेबाजी आहे. धर्माचा आणि कार्यकरणभावाचा बिलकुल संबंध नाही. निदान त्यांतला कार्यकरणभाव पापपुण्याच्या खोट्या कल्पनांवर आधारलेला असतो, त्याचा शास्त्रीय ज्ञानाशीं संबंध नाही, हें गीतेवरून तरी स्पष्टच दिसतें. ' खऱ्या धार्मिक लोकांना आपल्या पक्षांत अवश्य घ्यावें ' असें लेनिनचें मत गाडगीळ सांगतात. तें तसें असेल, पण लेनिनला शक्य तितक्या लोकांचा पाठिंबा पाहिजे होता अितकाच त्याच अर्थ आहे. हिंदूंना मार्क्सवादाकडे ओढण्याकरतां गाडगिळांची ही युक्ति आहे की काय हें समजत नाही, आणि राजकारणांत थापा द्याव्या लागतात अशा दृष्टीने कदाचित् त्यांच्या व्याख्यानाचें समर्थन करतां येईल. पण प्रामाणिक माणसाना तें पटणार नाही.

तुमच्या वसंत–व्याख्यानमालेंतल्या अश्लीलतेवरच्या व्याख्यानाला गेली होतीस का तूं ? व्याख्यात्यांनी संस्कृतांतले आधार घेऊन सांगितलें की शृंगार म्हणजे अश्लील नव्हे, आणि याचें उदाहरण म्हणून कृष्णराव मराठ्यांनी निवडक ' अश्लील ' उतारे अेकत्र छापले होते तेच त्यांनी घेतले, आणि सांगितलें की त्यांतले बहुतेक सर्व उतारे संस्कृत साहित्यशास्त्राच्या दृष्टीने अभिजात शृंगाराचे नमुने शोभतील असे आहेत. आतां कृष्णराव मराठ्यांचें मनच अश्लील असल्या-त्यामुळे हे अभिजात शृंगाराचे नमुने त्यांना अश्लील वाटतात असें कोणी म्हटलें तर त्यांत काय चूक आहे ? तसेंच मायदेवांच्या ' सुधा' काव्यांतलें बलात्काराचें वर्णन देखील व्याख्यात्यांना अश्लील वाटलें नाही.

यानंतर कृष्णराव मराठे बोलले. त्यांनी सरळ सांगितलें की संस्कृत वाङ्मय फारशा लोकांना त्यावेळींही कळत नव्हतें आणि हल्लीही कळत नाही, तेव्हां त्यात भरपूर शृंगार असला तरी तो मराठींत असूं नये, कारण मराठी सर्वांना कळतें. यांतून दोन गोष्टी स्पष्ट होतात. अेकतर ते शृंगारालाच अश्लील समजतात, आणि फार लोकांना कळणार नाही असें अश्लील लिहायला हरकत नाही, कळेल असें मात्र लिहूं नये. आणि त्यांनी स्वतःचें समर्थन असें केलें की

त्यांनी काढलेल्या आक्षेपांवरून लेखकांवर खटले झालेले आहेत आणि त्यांना शिक्षा झालेली आहे. साप चावल्यामुळे पुष्कळ माणसें मरतात, तेव्हां आपण मोठी उत्तम कामगिरी करतों असें सापाला वाटणें साहजिक आहे, पण अितरांना तसें वाटायचें कांहीं कारण नाही, आणि श्रोत्यांनाही तसें वाटलें नाही, कारण त्यांनी मराठ्यांना पुढें बोलूं दिलें नाहीं. नंतर मराठ्यांचें भाषण उत्तर देण्याच्या लायकीचें नाही म्हणून व्याख्यात्यांनी उत्तर दिलें नाही, आणि अध्यक्ष तात्यासाहेब केळकरांनी समारोप केला. त्यांनीं मराठ्यांचें म्हणणें खोडून काढलें आणि रामपंचायतनाचें उदाहरण देऊन सांगितलें की हल्ली उल्लू मनुष्य देखील अितरांच्या देखत बायकोला मांडीवर घेऊन बसणार नाही, पण रामपंचायतनाच्या चित्रांतला राम अितक्या लोकांच्या देखत सीतेला मांडीवर घेऊन बसलेला आहे. आणि हें चित्र घरोघर असतें, तेव्हां तें फार लोकांना कळत नाही ही मराठ्यांची सबब या ठिकाणीं चालणार नाही. त्या चित्राबद्दल आक्षेप घेऊन तें विकणारांवर फिर्याद करण्याची मराठ्यांची छाती आहे काय ?

पण अध्यक्षांनीही मायदेवांचें काव्य अश्लील ठरवलेंच. मायदेव सभेंत होतेच. 'त्यांत अश्लील काय आहे ?' असें त्यानी विचारलें. अेकंदरींत काय ? व्याख्याते प्रो. आठवले, अध्यक्ष साहित्याचार्य केळकर, सभेंत बसलेले कवि मायदेव,आणि अश्लीलतालोलुप मराठे यांतल्या कोणत्याही दोघांचें या बाबतींत अेकमत नाही. मराठ्यांनी तर स्पष्टच सांगितलें की 'अश्लील म्हणून अनेक निरनिराळ्या स्त्री व पुरुष साहित्यिकांनी ठरवलें तेंच अश्लील असें आम्ही धरून चालतों.' सारांश अश्लील म्हणजे काय हें मराठ्यांच्या बगलेंतल्या कांही साहित्यिकांच्या बहुमताने ठरवायचें आणि हीच अश्लीलतेची व्याख्या. खरी गोष्ट अशी की पाण्याला जसा मूळचा रंग नसतो, आणि तें ज्यांत मिळवावें तसाच त्याचा रंग होतो, तशी अश्लीलता देखील मुळांत नसतेच. ज्याचें मन अश्लील, त्याला कोठे काय अश्लील दिसेल याचा नियम नाही. तो आपल्यासारखेच दहापांच लोक गोळा करून तें अश्लील ठरवतो. त्यांच्याच जातीचा अेखादा मॅजिस्ट्रेट भेटला म्हणजे तो शिक्षा करतो. म्हणून अश्लील असें कांहीं असतें असें सिद्ध होत नाही.

# अेजंटांचीं नांवें

मुंबई : श्री. विठ्ठल बाबू बागवे, न्यूज एजंट, दादर.

पुणें : अेल्. के. जोशी, बुकसेलर
कोल्हापूर: स्कूल अॅन्ड कॉलेज बुकस्टॉल.
बेळगांव: जे. एम्. माणूरकर खडे बाजार.
दक्षिण हैदराबाद: महाराष्ट्र न्यूज एजन्सी.
इंदूर: पुरोहित अॅन्ड सन्स्.*
अहमदनगर: पी. जी. बापट, बुकसेलर, नवी पेठ.

कारवार: मुजुमदार आणि कसबेकर
सावंतवाडी: शिरोडकर ब्रदर्स.
निपाणी : के. एस्. बळगुर्गी
ग्वाल्हेर : डोके ब्रदर्स, लष्कर.
बेलापूर रोड : ना. अ. पेंडसे.
भुसावळ : पी. टी. पुराणिक.
उमरावती : अण्णा विठ्ठल काळे
कराची : केसरकर ब्रदर्स.

* येथें आमचा इतर मालही मिळेल.


# आमचेकडे मिळणारा माल

डच कॅप ( कांहीं आकार, येथे बनवलेले ) प्रत्यकीं, रु. ५.
उभट टोपी ( लहान, मध्यम किंवा मोठी ), प्रत्येकीं रु. २.
राअिट जेली ( आम्ही बनवलेली ), ... .... रु. ४.
कामोत्तजक नं. १ ( बरेच दिवस घेण्याकरतां ), रु. ४.
कामोत्तजक नं. २ ( प्रसंगीं घेण्याकरतां ) .... रु. ६
कषायचूर्ण ( योनिमार्ग धुण्याकरतां सुवासिक, आकुंचक चूर्ण ), बाटली ... ... रु. २॥.

राअिट अेजन्सी, १३, नवी भटवाडी, मुंबई-४.



मुद्रण स्थळ:—पॉप्युलर प्रिंटिंग प्रेस, १०३, ताडदेव रोड, मुंबई नं. ७

मुद्रक व प्रकाशक:—रघुनाथ धोंडो कर्वे, राइट् एजन्सी, नं. १३, नवी भटवाडी, गिरगांव, मुंबई.

Registered No. B. 2289.

राइट एजन्सी, नं. १३, नवी भटवाडी, मुंबई, नं. ४.

## प्रो. र. धों. कर्वे, एम्. ए. कृत इतर पुस्तकें

१. आधुनिक आहारशास्त्र, किं. १॥ रु., ट. ख. ५ आणे.
२. आधुनिक कामशास्त्र [ सचित्र ], तिसरी आवृत्ति
किंमत रु. २॥, ट. ख. ६ आणे.
३. संततिनियमन [ सचित्र ], ८ वी आवृत्ति,
किंमत १ रुपया, ट. ख. ४ आणे.
४. गुप्त रोगांपासून बचाव [ सचित्र ], ३ री आ.
किंमत १२ आणे, ट. ख. ४ आणे.
५. 'समाजस्वास्थ्य' मासिकांतील निवडक लेख,
भाग १ ला [पहिलीं तीन वर्षें], खलास आहे.
भाग २ रा [वर्षें ४–५–६], किं. २–०–०, ट. ख. ५ आ.
६. त्वचेची निगा. किं. ८ आ., ट. ख. ४ आ.
७. गुरुबाजी (नाटक) किं. ८ आणे, ट. ख. ४ आणे.
८. वेश्याव्यवसाय, किं. २ रु., ट. ख. ५ आ.
९. तेरा गोष्टी, किं. १ रु., ट. ख. ४ आ.

## डॉ. के. भा. लेलेकृत

१. बाहेरख्यालीचे दुष्परिणाम, २ री आ., किं. ३ आ.
२. मूळव्याध. किं. २ आ.

## श्री. भास्कर धोंडो कर्वे, एम्. एड्. कृत,

१. मी कसा झालों ? किं. ८ आ., ट. ख. ४ आ.
२. बालमनाचें रहस्य, किं. रु. १।, ट. ख. ५ आणे.

## प्रो. धों. के. कर्वे कृत

संक्षिप्त आत्मवृत्त, किं. १२, ट. ख. ५ आ.

# समाजस्वास्थ्य

## मासिक मिळण्याचीं ठिकाणें :

**मुंबई व उपनगरचे एजंट :**

श्री. विठ्ठल बाबू बागवे, न्यूज एजंट, दादर.

**पुणें**: एल्. के. जोशी बुकसेलर.

**कोल्हापूर**: स्कूल अॅन्ड कॉलेज बुकस्टॉल.

**बेळगांव**: जे. एम. माणूरकर अँड ब्रदर्स, खडे बाजार.

**दक्षिण हैदराबाद**: महाराष्ट्र न्यूज एजन्सी.

**इंदूर**: पुरोहित अॅन्ड सन्स्.*

**अहमदनगर**: पी. जी. बापट, बुकसेलर, नवी पेठ.

**कारवार**: मुजुमदार आणि कसबेकर

**सावंतवाडी**: शिरोडकर ब्रदर्स.

**निपाणी** : के. एस्. बळगुर्गी

**ग्वाल्हेर** : डोके ब्रदर्स, लष्कर.

**बेलापूर रोड** : ना. अ. पेंडसे.

**भुसावळ** : पी. टी. पुराणिक.

**उमरावती** : अण्णा विठ्ठल काळे.

**कराची** : केसरकर ब्रदर्स.

**यवतमाळ** : राजाराम यादव मेश्राम, वंजारी फैल.

* येथें आमचा इतर मालही मिळेल.

Registered No. B. 2289.

राइट एजन्सी, नं. १३, नवी भटवाडी, मुंबई, नं. ४.

## प्रो. र. धों. कर्वे, एम्. ए. कृत इतर पुस्तकें

१. आधुनिक आहारशास्त्र, किं. १॥ रु., ट. ख. ५ आणे.
२. आधुनिक कामशास्त्र [ सचित्र ], तिसरी आवृत्ति
किंमत रु. २॥, ट. ख. ६ आणे.
३. संततिनियमन [ सचित्र ], ८ वी आवृत्ति,
किंमत १ रुपया, ट. ख. ४ आणे.
४. गुप्त रोगांपासून बचाव [ सचित्र ], ३ री आ.
किंमत १२ आणे, ट. ख. ४ आणे.
५. 'समाजस्वास्थ्य' मासिकांतील निवडक लेख,
भाग १ ला [पहिलीं तीन वर्षें], खलास आहे.
भाग २ रा [वर्षें ४–५–६], किं. २–०–०, ट. ख. ५ आ.
६. त्वचेची निगा. किं. ८ आ. ट. ख. ४ आ.
७. गुरुबाजी (नाटक ) किं. ८ आणे, ट. ख. ४ आणे.
८. वेश्याव्यवसाय, किं. २ रु. ट. ख. ५ आ.
९. तेरा गोष्टी, किं. १ रु. ट. ख. ४ आ.

### डॉ. के. भा. लेलेकृत

१. बाहेरख्यालीचे दुष्परिणाम, २ री आ., किं. ३ आ.
२. मूळव्याध. किं. २ आ.

### श्री. भास्कर धोंडो कर्वे, एम्. एड्. कृत,

१. मी कसा झालों ? किं. ८ आ., ट. ख. ४ आ
२. बालमनाचें रहस्य, किं. रु. १।, ट. ख. ५ आणे.

### प्रो. धों. के. कर्वे कृत

संक्षिप्त आत्मवृत्त, किं. १२, ट. ख. ५ आ.